भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

विषय :- भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मिल्लतनगर येथे अतिरिक्त शांतता क्षेत्र निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग शासन निर्णय क्रमांक:ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/ (भाग २) तां.क.१ दि. २० नोव्हेंबर, २०१७ अन्वये ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ च्या प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शांतता क्षेत्र / झोन घोषित करणेबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केले आहेत. भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण १६ ठिकाणी घोषित केलेल्या शांतता क्षेत्रामध्ये ममता हॉस्पिटल, मिल्लतनगर, प्रभाग समिती क्र. १ याचा समावेश आहे. तथापी सदर ठिकाणी मिल्लतनगर परिसरात नो पार्किंग, सायलेन्स झोन, स्पिड लिमिट, २० कि.मी./ अवर तसेच ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेबाबत मा. पोलिस निरीक्षक, वाहतुक उप- विभाग, भिवंडी यांनी हरकत नसलेबाबतचे पत्र जा.क्र./श.वा.उ.प.वि. /भिवंडी/६०/२०२३, दि. ३१/०१/२०२३ अन्वये भिवंडी मनपास कळविणेत आले आहे. तसेच भिवंडी मनपातील पर्यावरण विभागामार्फत मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत ध्वनी प्रदुषणाची चाचणी करणेत आली असुन, प्राप्त परिक्षण अहवालानुसार ममता हॉस्पिटल, मिल्लतनगर, प्रभाग समिती क्र. १ या परिसरात ध्वनीची तीव्रता मानांकापेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे. प्राप्त अहवालानुसार मिल्लतनगर या परिसरात हॉस्पिटल, मस्जिद, दर्गा, शाळा आणि महाविद्यालय असल्याने शांतता क्षेत्र निश्चित करणे बाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजुरी करिता सादर करण्यांत आले आहे. सदर प्रस्तावास शहर अभियंता, अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २१/०६/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव क्रं. :- २५० | दिनांक :-०६ / ०९ /२०२३

मिल्लतनगर परिसरात नो पार्किंग, सायलेन्स झोन, स्पिड लिमिट, २० कि.मी./ अवर तसेच ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेबाबत मा. पोलिस निरीक्षक, वाहतुक उप-विभाग, भिवंडी यांनी हरकत नसलेबाबतचे पत्र जा.क्र./श.वा.उ.प.वि./भिवंडी/६०/२०२३, दि.३१/०१/ २०२३ अन्वये भिवंडी मनपास कळविणेत आले आहे. तसेच भिवंडी मनपातील पर्यावरण विभागामार्फत मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत ध्वनी प्रदुषणाची चाचणी करणेत आली असुन, प्राप्त परिक्षण

अहवालानुसार ममता हॉस्पिटल, मिल्लतनगर, प्रभाग समिती क्र. १ या परिसरात ध्वनीची तीव्रता मानांकापेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग शासन निर्णय क्रमांक:ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/ (भाग २) तां.क.१ दि. २० नोव्हेंबर, २०१७ अन्वये ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ च्या प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शांतता क्षेत्र / झोन घोषित करणेबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केले आहेत. प्राप्त अहवालानुसार मिल्लतनगर या परिसरात हॉस्पिटल, मस्जिद, दर्गा, शाळा आणि महाविद्यालय असल्याने शांतता क्षेत्र निश्चित करणे बाबतच्या प्रस्तावास शहर अभियंता, अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका